# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-४११००४

## प्रकटन

::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::::

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेशी संलग्न राज्यातील सर्व मान्यता प्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्रमुखांना कळविण्यात येते की, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर अध्यापन करणा-या शिक्षकांचे वरिष्ठ वेतनश्रेणी, कला वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी (कला शिक्षकांसह) जिल्हास्तरीय सेवांतर्गत प्रशिक्षण सर्व विभागीय मंडळामार्फत व सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांच्या सहकार्याने राज्यामध्ये आयोजित करण्यात येते. सदर वरिष्ठ वेतनश्रेणी, कला वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी (कला शिक्षकांसह) या जिल्हास्तरीय सेवांतर्गत प्रशिक्षणात प्रत्यक्ष सहभाग घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची उपस्थिती पत्रके व अंतिम मूल्यमापन तक्ते संबंधित केंद्राकडून सर्व विभागीय मंडळामार्फत राज्यमंडळास प्राप्त होतात. सदर प्रशिक्षणार्थ्यांची उपस्थिती पत्रकावरील दहा दिवस हजेरी आणि अंतिम मूल्यमापन तक्त्यातील गृहकार्य पूर्ण आहे, अशाच प्रशिक्षणार्थ्यांना राज्यमंडळामार्फत प्रमाणपत्रे तयार करुन विभागीय मंडळामार्फत शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांचेव्दारे संबंधित प्रशिक्षणार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यासाठी वितरित करण्यात येतात.

याप्रमाणे सेवांतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांचे प्रमाणपत्र गहाळ झाल्यास त्याबाबतचे सबळ पुरावे कार्यालयास खालीलप्रमाणे सादर केल्यावर संबंधित प्रशिक्षणार्थ्यांना विहीत शुल्क अदा करुन दुबार प्रमाणपत्र देण्याबाबत कार्यवाही करण्यात येते.

१) प्रशिक्षणार्थ्यांचा अर्ज २) प्रशिक्षणार्थ्यांच्या संबंधित शाळा मुख्याध्यापकाचे प्रशिक्षण पूर्ण केल्याबाबतचे पत्र ३) संबंधित प्रशिक्षण केंद्राच्या केंद्रसंचालकांचे प्रशिक्षणार्थ्यास दिलेले उपस्थिती पत्रक ४)प्रमाणपत्र देण्याबाबत शिक्षणाधिका-यांचे शिफारस पत्र.

**तसेच सदर प्रशिक्षणार्थ्यांनी दुबार प्रमाणपत्राची मागणी संबंधित विभागीय मंडळामार्फत राज्यमंडळास करावी.** तसेच मंडळाने विहीत केलेले दुबार प्रमाणपत्रासाठी वरिष्ठ वेतनश्रेणी रुपये ५००/- व निवडश्रेणी रुपये १०००/- याप्रमाणे **सचिव,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४** या नावांने सदर रकमेचा धनाकर्ष पाठविण्यात यावा, त्यानंतरच संबंधित प्रशिक्षणार्थ्यास दुबार प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येईल. याबाबत सर्व शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख व शिक्षकांनी नोंद घ्यावी.

(कृष्णकुमार पाटील)
सचिव,
राज्यमंडळ,पुणे-०४